राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून मार्जिन मनी लोन योजनेंतर्गत राज्य शासनास सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ मध्ये प्राप्त झालेल्या कर्जावरील व्याज तसेच सन २०२३-२४ मधील कर्जावरील मुद्दलाची परतफेड करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः ससाका-०७२६ /प्र.क्र.८६/३स

रूम नं. ६२०, सहावा मजला, विस्तार इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक : २३ जुलै, २०२६

संदर्भ :- १. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांक:ससाका २०२३/प्र.क्र.२३/३स, दि. ०४.०५.२०२३.

२. राष्ट्रीय सहकार विकास निगम यांची दि. ३०.०६.२०२३, दि. ३१.०७.२०२४, दि.२१.०८.२०२४, दि. ०६.०३.२०२५, दि. २७.०३.२०२५, दि. ०४.०२.२०२६ व दि. १६.०२.२०२६ रोजीची पत्रे

३. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: पूरक ०६२३/प्र.क्र.६८/३स, दि. ०३.०८.२०२३.

४. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: पूरक ०६२४/प्र.क्र.५१/३स, दि. ०१.०८.२०२४

५. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: पूरक ०६२४/प्र.क्र.५१/३स, दि. २६.०८.२०२४.

६. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: पूरक ०६२४/प्र.क्र.५१/३स, दि. १३.०२.२०२५.

७. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: बैठक ०८२४/प्र.क्र.८५/३स, दि. १०.०३.२०२५.

८. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: बैठक ०२२५/प्र.क्र.४४/३स, दि. २८.०३.२०२५.

९. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: बैठक ०३२५/प्र.क्र.६२/३स, दि. २९.०३.२०२५.

१०. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: बैठक ०६२५/प्र.क्र.९९/३स, दि. १६.०३.२०२६.

११. शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक: ससाका ०४२५/प्र.क्र.८९/३स, दि. २५.०६.२०२५.

१२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि. ०९.०४.२०२६.

१३.सहायक निदेशक (वित्त), राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. NCDC: A&C/IX(१)/Rep/०९ दि. ३०.०६.२०२६.

प्रस्तावना :-

राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) ही सहकारिता मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत एक वैधानिक संस्था आहे. राज्य शासन (सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग) राष्ट्रीय सहकार विकास निगम पुरस्कृत योजनांतर्गत कृषि प्रक्रिया सहकारी संस्थांना प्रकल्पांच्या उभारणी करिता विहीत केलेल्या आकृतीबंधानुसार योजनेच्या मंजूर वित्तीय आराखड्यानुसार शासकीय भागभांडवल तसेच कर्ज उपलब्ध करून देते. राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) खेळत्या भांडवलासाठी सहकारी साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्याकरीता संदर्भ क्र. १ आणि ११ येथील शासन निर्णयान्वये धोरण ठरविण्यात आले आहे. सदर धोरणानुसार राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कडून सहकारी साखर कारखान्यांना रु.५१,५३,५२,००,०००/- इतके मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन देण्यास संदर्भ क्र. २ येथील पत्रांन्वये सहमती दर्शविली.

तथापि, काही कारखान्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगम यांच्याकडून परस्पर कर्ज घेतले असल्यामुळे व सदर कर्जाची वसूली बाकी असल्यामूळे राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी शासनाने कारखान्यास मंजूर केलेल्या मार्जिन मनी लोन मधून त्या कर्जाच्या रकमा वजा करुन शासनास मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन दिले आहे. त्यानुसार एकूण ३६ सहकारी साखर कारखान्यांना संदर्भ क्र. ३ ते १० येथील शासन निर्णयांन्वये मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. आता राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांनी सदर रु.५१,५३,५२,००,०००/- इतक्या कर्जावरील रु.४,३४,२६,५६,४७०/- इतके व्याज व सन २०२३-२४ मध्ये घेतलेल्या कर्जावरील रु.९१,५९,००,०००/-इतके मुद्दल भरणा करण्याबाबत संदर्भ क्र.१३ येथील पत्रान्वये शासनास सूचित केले आहे. त्यामुळे सदर व्याजाची रक्कम राष्ट्रीय सहकार विकास निगम यांना अदा करणे आवश्यक आहे. त्याकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात (२०४९ १०४३ व ६००३ ०२४२) या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीमधून राष्ट्रीय सहकार विकास निगम यांना निधी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील सहकार विकासाकरिता राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांनी राज्यातील आर्थिक अडचणीतील सहकारी साखर कारखान्यांना महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) खेळत्या भांडवलासाठी सन २०२३-२४ ते सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु.५१,५३,५२,००,०००/- इतके कर्ज मंजुर केले होते. सदर कर्जावरील व्याज रु.४,३४,२६,५६,४७०/- इतके व्याज व सन २०२३-२४ मधील कर्जाची रु.९१,५९,००,०००/-इतके मुद्दल अश्याप्रकारे एकूण रु.५,२५,८५,५६,४७० इतकी रक्कम सन २०२६-२७ च्या परतफेडीच्या हप्त्यापोटी राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांना अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर खर्च चालू आर्थिक वर्षात (२०२६-२७) मध्ये खालील नमूद लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

१) मागणी क्र. व्ही ०१, देशांतर्गत ऋणांवरील व्याज
२००, देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज
(०२) कर्जावरील व्याज,
(०२) (०१) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून मिळणा-या कर्जावरील व्याज (सहकार)
(अनिवार्य)
४५, व्याज (२०४९ १०४३)

२) मागणी क्र.व्ही ०४,
००, १०८ राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे (००),
(००)(०१) राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मिळालेली कर्जे
(सहकार)
(अनिवार्य),
५६, कर्जाची परतफेड (६००३ ०२४२)

३. राष्ट्रीय सहकारी विकास निगम, नवी दिल्ली यांना मंजूर केलेली उपरोल्लिखित रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून आहरण करुन राष्ट्रीय सहकारी विकास निगमला त्याचे वितरण करण्यासाठी श्री. सु.पु. पांगारकर, कार्यासन अधिकारी, रोखशाखा, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच, श्री. अंकुश शिंगाडे, सह सचिव (साखर), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. उपरोल्लेखित रक्कम RTGS सुविधेव्दारे राष्ट्रीय सहकार विकास निगम. नवी दिल्ली यांना अदा करावयाची असून त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Name of the account	National Cooperative Development Corporation
Name of the bank	State Bank of India
Name of the Branch	Commercial Branch, Nehru place, New Delhi
Account No.	३२१६४०५२८७४
IFSC Code	SBIN०००४२९८

५. राष्ट्रीय सहकार विकास निगम, नवी दिल्ली यांनी सदर रक्कम प्राप्त झाल्याची पोच महाराष्ट्र शासनास नोंदणीकृत डाकेने/ ई-मेलव्दारे मुद्रांकित पावती पाठवावी.

६. वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. १२ येथील दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील अटींची तसेच, त्यासोबतच्या परिशिष्टातील प्रस्तावाला लागू असलेल्या अटींची पूर्तता होत असल्याचे (परिशिष्टातील अनुक्रमांक ८ येथील अट वगळून) प्रमाणित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४७५/२०२६/व्यय-२ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२३१४५७१७०६४७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH
PANDURANG
SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F8C437078A333B7111446A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG SHINGADE
Date: 2026.07.23 14:58:09 +05'30'

(अंकुश शिंगाडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. प्रधान सचिव, (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. उप सचिव (अर्थसंकल्प) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अवर सचिव (१७ स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा) तथा आहरण व संवितरण अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई. (३ प्रतीसह)
५. कक्ष अधिकारी (व्यय -२/अर्थोपाय/अर्थसंकल्प-१३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१०. सह संचालक, लेखा व कोषागरे (संगणक शाखा) नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई
११. सहायक निदेशक (वित्त) राष्ट्रीय सहकार विकास निगम, ४ सिरी इन्स्टिट्यूशनल एरिया, हौज खास, नवी दिल्ली ११० ०१६
१२. प्रादेशिक संचालक, राष्ट्रीय सहकार विकास निगम, ५ बी.जे. रोड, पुणे.
१३. निवड नस्ती (कार्यासन ३-स).